**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४४/२०२५**
( राहूल प्र.पाटील वि. प्रियांका रा. पाटील)

**अर्ज नि.१२ खाली आदेश**

अज्ञान मुलांचा ताबा मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला असून, अर्जदार याला जाबदार ही सोडून गेल्यापासून मुलांना भेटू देत नाही. त्यामुळे अज्ञान मुले राजरुद्र व अहान यांना भेटण्यासाठी जाबदार हिने त्यांना न्यायालयात हजर करण्याबाबत सदरचा अर्ज दिलेला आहे.

२. जाबदारतर्फे नि.१३ अन्वये म्हणणे दिले असून, जाबदार हिने अर्जदार याला मुलांना भेटण्यापासून केव्हाही थांबविले नव्हते. अर्जदार याच्या व्यसनी व रागीट स्वभावाचा मुलांवर चुकीचा प्रभाव पडू नये म्हणून दोनही मुले जाबदार हिच्या सोबत आहेत. न्यायालयाच्या आवारात दोनही मुलांना अर्जदार याने भेटण्यास जाबदार हिची तक्रार अथवा अडचण नाही. सदरची भेट होत असताना मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत विचार करण्यात यावा व योग्य ते आदेश व्हावेत असे जाबदार हिचे म्हणणे आहे.

३. दोनही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. सदरचा मूळ अर्ज गार्डीयन अॅन्ड वॉर्डस अॅक्ट १८९० चे कलम २५ व हिंदू मॉयनोरिटी अॅन्ड गार्डीयनशिप अॅक्ट १९५६ अन्वये कु. राजरुद्र व कु. अहान राहूल पाटील यांचा कायम स्वरुपी ताबा मिळण्याकरीता मूळ अर्ज दाखल केलेला असून जाबदार हिने अज्ञान मुलांना न्यायालयात हजर ठेवण्याबाबत

आदेश मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

**५.** अज्ञान मुले शाळेत शिक्षण घेत असल्याचे अर्जदार व जाबदार यांनी मान्य केले आहे. मुलांवर चुकीचा प्रभाव पडू नये याची खबरदारी जाबदार हिने घेतली आहे. न्यायालयाच्या आवारात मुलांना अर्जदार याने भेटल्यास तिची/जाबदार हिची तक्रार नाही. मुलांचे वय व त्यांचे शिक्षण याचा विचार करुन महिन्यातून एक दिवस जाबदार हिने मुलांना अर्जदार याला भेटण्याकरीता न्यायालयात आणण्याचे आदेश पारीत केल्यास योग्य व न्यायाचे होईल. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे -

**<u>आदेश</u>**

१. या न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत जाबदार हिने न्यायालयाच्या कामकाजाच्या प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी राजरुद्र व अहान यांना न्यायालय,विटा येथे अर्जदार याला भेटण्याकरीता आणावे

२. जाबदार हिने सकाळी ११ ते दुपारी २.३० पर्यंत दोनही मुलांना अर्जदार याला भेटू दयावे. अर्जदार याने दोनही मुलांना न्यायालय विटाच्या आवारात भेटावे.

३. अर्जदार याने कोणतीही सबब न सांगता दोनही मुलांचा ताबा त्याचदिवशी दुपारी २.३० वाजता जाबदार हिच्याकडे परत दयावा.

४. या आदेशाच्या पूर्ततेकामी अर्जदार व जाबदार यांनी त्या दिवशी न्यायालयात पुरशिस सादर करावी.

USHA VEERENDRA INDAPURE

Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.01.19 17:50:52 +0530

विटा
दि.१९.०१.२०२६

(उषा वि. इंदापुरे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश- १
विटा

Vita
dt.21.12.2025

(Usha V. Indapure)
Adhoc District Judge – 1
Vita.